MHAU120004622026

**फौ.कि.अर्ज क्र.–३१/२०२६**
**वंदना जोंधळे वि. सरकार**

## <u>निशाणी –१ खाली आदेश</u>

**०१.** प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने कलम ५०३ भारतीय नागरी सुरक्षा संहितेप्रमाणे राज्य उत्पादन शुल्क, यांनी अपराध क्र.–१३२/२०२६, मधील जप्त केलेले मोटरसायकल Tvs Jupitor Scooty ज्याचा नोंदणी क्रमांक–MH–20 HM–5563 असुन ते परत मिळणेकरीता दाखल केला आहे.

**०२.** पुढे त्याने असे कथन केले आहे की, सदर मोटरसायकलचा तो ताबेदार व मालक असून, सदर मोटरसायकल ही राज्य उत्पादन शुल्क यांनी सोयगाव पोलीस स्टेशन हद्दीत वर नमुद गुन्हयामध्ये जप्त केलेले आहे. सदर मोटरसायकल ही पोलीस स्टेशनला उघडयावर पडलेले असल्याने, ती खराब होईल. तसेच त्याने अर्जासोबत आर. सी. बुकची छायांकित प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. अर्जदार हा जप्त केलेल्या मोटरसायकलचा ताबेदार असुन, त्यास मोटरसायकल परत मिळावे, अशी विनंती केली आहे.

**०३.** तपास अधिकारी यांनी नि. क्र.४ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल केले असुन, त्यांनी कथन केले की, सदर वाहन कोणत्या व्यक्तीच्या नावे नोंदणीकृत आहे, याबाबत परिवहन कार्यालयातून माहिती प्राप्त झालेली नाही. सदर गुन्हयाचा तपास चालू आहे व त्यावर पुन्हा दारु वाहतुक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता वाहन न सोडण्याची विनंती त्यांनी केली.

**०४.** सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी नि. क्र.५ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यात त्यांनी असे कथन केले आहे की, सदर वाहन हे वर नमुद गुन्हयातील महत्वाचा पुरावा आहे. तसेच सदर वाहन अर्जदारास परत केल्यास ते विक्री किंवा महत्वाचे भागात बदल करु शकतात व तसेच वाहनाची विल्हेवाट लावू शकतात. त्यामुळे सदर वाहन वाहन परत करण्यात येवू नये अशी त्यांनी विनंती केली. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**०५.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. तसेच, सदर प्रकरणात दाखल केलेल्या आर. सी. बुकची अभिलेखावरील प्रतवरुन असे निदर्शनास येते की, अर्जदार ही सदर वाहनाचा मुळ मालक असल्याचे दिसते.

तसेच अर्जदाराने त्याचे आधार कार्डची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. तसेच The Hon'ble Supreme Court in ***A.I.R. 2003 S.C. 638 Sunderbai Desai Vs. State of Gujrath*** has held that, the seized muddemal should be returned back at the earliest. If they are kept lying in the police station then the machinery will be damaged.

**०६.** उपरोक्त न्यायनिवाडयाचे न्यायतत्वानुसार जप्त केलेले वाहन हे पोलीस स्टेशन येथे काहीही उपयोग न होता पडुन राहिल्यास खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच अर्जदार हा कागदोपत्री पुराव्यावरुन प्रथमदर्शनी मालक असल्याचे त्याला सदर वाहनाचा अंतरिम ताबा देणे योग्य होईल. त्यामुळे अर्जदारास योग्य अटी व शर्तीवर सदर वाहन सुपुर्तनाम्यावर परत देणे योग्य होईल म्हणुन मी खालील आदेश पारित करीत आहे

## आदेश

**१.** अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

**२.** तपास अधिकारी यांना निर्देशित करण्यात येते की, पोलीस स्टेशन सोयगाव येथील अपराध क्र.–१३२/२०२६, मधील जप्त केलेले मोटरसायकल Tvs Jupitor Scooty ज्याचा नोंदणी क्रमांक–MH–20 HM–5563, त्यांनी रुपये १,००,०००/–(अक्षरी रुपये एक लाख) च्या बंधपत्रावर सोडुन देण्यात यावे. सदर बंधपत्र हे रुपये २००/– च्या स्टॅम्पवर असावे.

**३.** अर्जदार यांनी वर नमूद मोटरसायकलमध्ये कुठल्याही प्रकारचा बदल करु नये किंवा कुणालाही विकु नये. त्याचप्रमाणे सदर वाहन त्यांनी न्यायालय किंवा या न्यायालयाचे वरिष्ठ न्यायालय सांगेल तेव्हा हजर करावे.

**४.** तपास अधिकारी यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी मोटरसायकल परत देण्याचा पंचनामा करुन सदर मोटरसायकलचे चारही बाजुने फोटो घ्यावे तसेच व्हीडीओ शुटींग सुध्दा करावी आणि त्याचा खर्च अर्जदाराने सोसावा.

**५.** तपासी अधिकारी यांनी बंधपत्र व इतर कागदपत्रे हे दोषारोप पत्रासोबत दाखल करावीत.

Digitally signed by PATIL MAHENDRA BHAGWAN
Date: 2026.07.08 16:10:14 +0530

[एम. बी. पाटील]
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
सोयगांव

**दिनांक** –०८/०७/२०२६